झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पुर्व), मुंबई-५१. फॅक्स:९१-२२-२६५९०४०७
दूरध्वनी: ०२२-६५९०५११/०४०५/१८७२/०९९१
Email : info@sra.gov.in

जा.क्र.मुंबई/मुकाअ/परिपत्रक/सज २००८/१२८/स्था
दिनांक 15 FEB 2008

परिपत्रक क्रमांक : ४०

# -: परिपत्रक :-

**विषय : पुनर्वसन योजनेकरीता मुख्य प्रवर्तक व विकासक निवड करतांना होणाऱ्या सभेस प्राधिकरणाकडून प्रतिनिधी उपस्थिती बाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्राप्त होणाऱ्या प्रस्तावासोबत संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सादर करण्यात येते. सदरचे इतिवृत्त पुनर्वसन योजना मंजूरीसाठी व नियोजित संस्थेच्या नांव आरक्षण व बँकेत खाते उघडण्याच्या परवानगी साठी अर्जासोबत जोडण्यात येते. सदर सभेच्या इतिवृत्तात मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक, संस्थेच्या योजनेचे विकासक, आर्कीटेक्ट, मुख्य प्रवर्तकाला संस्थेकडून अधिकार दिल्याचा ठराव, मुखत्यारपत्र आणि इतर करारपत्रे इत्यादि महत्वाच्या मुद्यांचा समावेश असतो. संस्थेकडून सादर करण्यात आलेल्या अश्या इतिवृत्ताबाबत किंवा संस्थेच्या सभेबाबत योजना मंजूर होतांना, संस्थेस नांव आरक्षण दिल्यानंतर, संस्था नोंदणीकृत झाल्यावर, संस्थेच्या पुनर्वसन इमारतीचे काम सुरू झाल्यावर या प्रकारे कुठल्याही स्तरापर्यंत कार्यवाही चालू असतांना काही झोपडीधारकांकडून मुख्य प्रवर्तकाचे निवडीबाबत, तसेच विकासकाच्या सहमती बाबत तथा अन्य काही संबधित कारणासाठी तक्रारी निर्माण होतात. पुनर्वसन योजनेची प्रगती होत असतांना अशा निर्माण होणाऱ्या तक्रारीमुळे संस्थेच्या पुनर्वसन योजनेच्या भवितव्यावर व अंमलबजावणीवर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे सर्व संबंधीतांना असे निर्देश देणेत येतात की, संस्थेचे परिशिष्ट-२ मिळालेनंतर संस्थेकडून घेण्यात येणारी मुख्य प्रवर्तक निवडी बाबतची सभा यामध्ये मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक निवड व विकासकाची संमती हे विषय अनिवार्य राहतील व सदरची सर्वसाधारण सभा ही प्राधिकरणाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत व्हिडीओ चित्रीकरणासह घेणेत येईल याबाबतचे पुढील निर्देश निर्गमित करण्यात येत आहेत.

१) सर्वसाधारण सभा आयोजित करण्यापूर्वी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांना सभा आयोजनाबाबत संस्थेकडून कळविण्यात येईल. त्यानंतर सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे पूर्वपरवानगीने सभेची तारीख, वेळ व सभेचे विषय ठरविण्यात आल्यावर संस्थेकडून सभेचे ठिकाण निश्चित करून सभा आयोजनाची पूर्व तयारी करण्यात येईल.

२) सभेची नोटीस १४ पूर्ण दिवसाची राहील, सभेच्या नोटीस मध्ये सभेची तारीख, वेळ, ठिकाण व सभेत चर्चा करण्यात येणाऱ्या विषयाचा उल्लेख असेल व सदर सभेची नोटीस संस्थेच्या

पुनर्वसन योजनेतील सर्व पात्र झोपडीधारकांना पोहोचेल याची व्यवस्था करण्याची जबाबदारी संस्थेची असेल.

३) सभेस पात्र झोपडीधारकांनी स्वत:ची ओळख होईल अशा ओळखपत्रासह उपस्थित रहाण्याच्या सूचना सभेच्या नोटीसी सोबत देण्यात याव्यात.

४) सभेच्या कामकाजाचे व्हिडीओ चित्रीकरणाची व्यवस्था प्राधिकरणाकडून करण्यात येईल. परंतु सदरचा व्हिडीओ चित्रीकरणाचा खर्च संस्थेने करावा.

५) संस्थेने नांव आरक्षणाच्या प्रस्तावासोबत सदर सभेचे इतिवृत्त उपस्थितांचे स्वाक्षरीसह सादर करावे.

६) वरील प्रमाणे घेतलेल्या सभेचे इतिवृत्तच पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावासोबत व नांव आरक्षण परवानगी देतांना ग्राहय धरण्यात येईल.

वरील निर्देशांची पुनर्वसन योजना स्विकारणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थेने पूर्तता करावी व सर्व पात्र झोपडीधारकांनी या सभेत नियमानूसार निवड झालेल्या मुख्य प्रवर्तक, विकासक, आर्कीटेक्ट यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंमजबजावणीत सहकार्य करावे.

१२/१२/२००८

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई.